# अण्णा भाऊ साठे याची शाहिरी : सामाजिक क्रांतीची मशाल

**डॉ. मनीषा झोंबाडे**
सहा. प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख
शिवाजी महाविद्यालय मुरुड ता.जि. लातूर

**प्रस्तावना :**

केवळ भारतातच नव्हे तर परदेशातही आपले शाहिरी काव्य गाजविणारे अण्णा भाऊ साठे हे एक तोलामोलाचे शाहीर आहेत. छत्रपती शिवाजी राजांचे चरित्र पोवड्याच्या माध्यमातून रशियन जनते पर्यंत पोहोचवून शिवाजी महाराजांची ख्याती पसरविणारे अण्णा भाऊ साठे हे शाहीर व्यक्तिमत्व रशियन राष्ट्राध्यक्षांच्या काळजापर्यंत पोहोचले. अण्णा भाऊंचा छत्रपती शिवरायांवरील दमदारपोवाडा रशियन राष्ट्राध्यक्षांना खूप आवडला आणि त्या राष्ट्राध्यक्षांनी त्यांचा तिथे सत्कार केला. अण्णा भाऊंच्या वास्तववादी पोवाड्यांची गरज रशियन जनतेला प्रेरित करण्यासाठी नक्कीच उपयोगी पडेल या हेतूने रशियन भाषेमध्ये त्यांचे पोवाडे भाषांतरित करण्याचे खूप मोठे कार्य या राष्ट्राध्यक्षांनी केले. अण्णाभाऊ साठे यांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक विशेष म्हणजे ते कम्युनिस्ट विचारसरणीने प्रभावित होते. १९४४ ला त्यांनी लाल बावटा नावाचे एक कलापथक स्थापन केले शाहीर गव्हाणकर, अमर शेख आणि अण्णा भाऊ साठे ह्या त्रिमूर्तींनी सहित या कलापथकामध्ये दहा-अकरा माणसांचा समूह होता. या कलापथकाद्वारे कामगारांना सोसाव्या लागणारे हाल अपेष्ट, भांडवलदाराकडून त्यांचे होणारे शोषण, कामगाराचे अस्तित्व याविषयी असंख्य प्रश्नांची मांडणी करत कामगार जीवनावर प्रकाश टाकला होता. विशेष म्हणजे अण्णा भाऊंची शाहिरी रचना ही जनजागृती, अन्याय, संघर्ष, या त्रिसूत्रींवर आधारलेली दिसते. सर्वसामान्य लोकांसाठी झटणारे, जनतेची कदर करणारे, बुलंद प्रतिभेचे शाहीर अशा विविध उपाध्यांनी अण्णा भाऊंच्या लढाऊ व्यक्तिमत्वाला अभिवादन केले जाते. अण्णाभाऊंच्या या अनमोल शाहिरी काव्याचा अभ्यास संशोधनात्मक दृष्टीकोनातून व्हावा या उद्देशाने हा शोधनिबंध सादर करीत आहे.

**विषय प्रवेश :**

अण्णा भाऊ साठे यांनी कथा, कादंबऱ्याप्रमाणेच शाहिरी या वाङ्मय प्रकारात स्वतः चा एक वेगळा ठसा उमटविला आहे. साधारणतः स्वातंत्र्यपूर्व कालखंडात म्हणजेच इ. स. १९४२ च्या सुमारास त्यांच्या शाहीर काव्य लेखनाला प्रारंभ झाला. त्यांचे शाहिरी काव्य हे शूरवीर मर्दांच्या कहाण्या नाहीत किंवा लावण्यवती च्या सौंदर्याचे वर्णनं नाहीत तर ते कष्टकरी, कामगार, शेतकरी यांच्या दु:ख, दारिद्र्याची करूणरसपूर्वक केलेलं वर्णन आहेत. एकंदरीतच तळागाळात खितपत पडलेल्या माणसाला नवचैतन्य देणं, अन्याया विरुद्ध निर्भीडपणे संघर्ष करण्यास प्रवृत्त करणे, क्रांतीकारक पिढी उभी करणे हे त्यांच्या शाहिरी काव्याचे प्रमुख प्रयोजन आहे . अण्णा भाऊंचे शाहिरी काव्य हे काल्पनिक नव्हे तर ते भावनिक आहे. शोषणकर्त्यांनी केलेल्या अन्याय विरुद्ध लढावयास लावणारे एक प्रेरक बळ आहे. अण्णा भाऊ लिखित लावण्या, गीतं आणि म्हणणी हे प्रकार आज सुद्धा तमाशात आणि लोकनाट्यात वापरले जातात. कारण ते समाजाला चिरकाल प्रेरक ठरणारे आहेत.

अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या शाहिरी काव्यातून समाज प्रबोधनचा वसा हाती घेतला आणि त्यातूनच त्यांनी समाज प्रबोधनासाठी व्यासपीठ म्हणून सर्वप्रथम ग्रामीण भाग निवडला. कारण त्या काळात खेड्यापाड्यातून तमाशा आणि लोकनाट्य हा मनोरंजनाचा प्रकार लोकांमध्ये खूप प्रिय होता. तमाशा असो की लोकनाट्य यामध्ये गण,लावणी,म्हणणी हे लोकनाट्य सुरु होण्यापूर्वी सादर करण्याची परंपरा होती. लोककला सादर करण्यापूर्वी देवीदेवतांना नमन व वंदन

करून आपली कला लोकांपुढे विना व्यत्य पूर्ण व्हावी असे आशीर्वाद मागितले जात असत.

परंतु देव देवतेला नमन करण्याची ही पध्दत अण्णा भाऊंनी मात्र मोडून काढली, नव्हे त्यांनी तिचे स्वरूपच बदलून टाकले. वास्तविक पाहता अण्णा भाऊ हे अल्प शिक्षित असले तरी त्यांच्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर व कॉम्रेड लेनिन यांच्या विचारांचा फार मोठा पगडा होता. आंबेडकरी व मार्क्सवादी विचारांनी प्रभावित झालेल्या त्यांच्या साहित्यिक व्यक्तिमत्वाने तळागाळातील सर्वसामान्य जनतेच्या न्याय व हक्कासाठी आपली लेखणी झिजवली. महापुरुषांच्या वैचारिकतेवर पाऊल टाकून वाटचाल करण्याची जणू त्यांनी धुरा उचलली होती. अण्णा भाऊ हे पुरोगामी विचारांचे होते. पूजा अर्चा, देवदेवता यावर त्यांचा मुळीच विश्वास नव्हता. देवदेवतांऐवजी मातृभूमी, देशभक्त, हुतात्मे, राष्ट्रवीर यांच्यावर त्यांची अमाप श्रद्धा होती, त्यांच्या कार्यकर्तृत्वावर विश्वास होता. त्यामुळेच त्यांनी आपल्या शाहिरी काव्याच्या सुरुवातीसच मातृ भूमीला वंदन केल्याचे दिसते. आपल्या देशावर,मातृभूमीवर त्यांनी जीव ओवाळून टाकला. याचा प्रत्यय त्यांच्या पुढील शाहिरी काव्यातून दिसून येतो.

*"प्रथम मायभूच्या चरणा!*
*छत्रपती शिवबा चरणा!*
*स्मरोनी गातो कवना!"*

आपली मायभूमी आणि छत्रपती शिवबांबद्दल किती हा जाजज्वल अभिमान, किती हा जिव्हाळा. महाराष्ट्र राज्याचे संस्थापक, मराठी माणसांचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी राजे यांना नमन करून पोवाड्याची सुरुवात करणारे अण्णा भाऊ साठे हे पहिले शाहीर आहेत. त्यांचं बालपण वाटेगाव मध्ये गेलेले त्यामुळे आपल गाव, गावातील एकोप्याने राहणारा समाज, वेळप्रसंगी एकमेकांच्या मदतीला धावून येणारी बाया माणसं या सर्वांनी बद्दल त्यांना आपुलकी तर होतीच परंतु त्यांच्या विलक्षण साहित्यिक व्यक्तिमत्त्वाची जडणघडण याच माणसांच्या प्रेरणेने झाली होती. अण्णा हे जरी मातंग समाजात जन्मले असले तरी ते लहानपणापासूनच वाटेगावच्या पंचक्रोशीत असणाऱ्या दलित वस्त्यांपासून ते पाटील कुलकर्ण्यांच्या चिरेबंदी वाड्यांपर्यंत वावरले होते. या दरम्यान त्यांना झालेल्या समाजवास्तवांचे दर्शन तोच त्यांच्या साहित्याचा विषय झाला. लहानपणापासून अण्णा भाऊ साठे यांना आपल्या मायभूमीचे नव्हे तर अवघ्या महाराष्ट्राचे रक्षण करणाऱ्या शिवाजी राजांबद्दल बद्दल नितांत आदर असल्याचे देखील दिसून येते. संत परंपरेतील ज्ञानेश्वरांपासून ते १९४९ चा संयुक्त महाराष्ट्राचा लढा, मुंबई महाराष्ट्राला मिळावी यासाठी रस्त्यावर आलेली जनता इथं पर्यंतचा संपूर्ण इतिहास आपल्या शाहिरीमध्ये प्रतिबिंबित करून महाराष्ट्रावर असलेले निस्सीम प्रेम त्यांनी व्यक्त केले आहे. मुळातच कॉम्रेड लेनीनाच्या विचाराने भारवलेल्या अण्णा भाऊ यांना रशियाबद्दल, तेथील जनतेबद्दल आस्था होती हे त्यांच्या 'स्टॅलिनग्राडचा पोवाडा' या पोवाड्याच्या माध्यमातून दिसून येते. स्टॅलिनग्राडची लढाई आणि दुसऱ्या महायुद्धातील रशिया विरुद्धची जी नाजी फौज होती त्या फौजीच्या युद्धाचे ठळक वर्णन या पोवाड्यात केले. अण्णा भाऊंनी शाहीरी रचनेची सुरुवात करताना 'पोवाडा' या काव्य प्रकाराला प्रथम प्राधान्य दिले. आज त्यांच्या नावावर एकूण पंधरा पोवाडे लिहिल्याचे आढळत असले तरी त्यापैकी त्यांचे नऊ पोवाडे आजही उपलब्ध आहेत. हे उपलब्ध पोवाडे अण्णांनी सामाजिक अंगाने, समाजहिताच्या दृष्टीने लिहलेले आहेत. या पोवाड्यामध्ये शूरवीर नायकाच्या कार्यकर्तृत्वाचे वर्णन नसून तत्कालीन समाज स्थितीचे दर्शन घडते. समाजामध्ये भांडवलदाराकडून शोषण कर्त्यांचे होणारे शोषण, कष्टकरी-कामगार यांना कामाचा योग्य तो मोबदला नसणे, सावकार करीत असलेली शेतकऱ्यांची पिळवणूक, सरकारचे शेतकऱ्याकडे डोळझाकपणे पाहणे आदी समाज वास्तवांचे दर्शन घडविणे हाच अण्णा भाऊ साठे यांच्या शाहिरी मागील उद्देश असल्याचा दिसतो. त्यांनी रचलेला 'स्टॅलिनग्राडचा पोवाडा', 'बर्लिनचा पोवाडा', 'बंगालची हाक', 'पंजाब दिल्लीचा दंगा', ' तेलंगणाचा संग्राम', 'महाराष्ट्राची परंपरा', ' अंमळनेरचे अमर हुतात्मे', 'मुंबईचा कामगार ' व 'काळ्या बाजाराचा पोवाडा' असे काही पोवाडे हे विदारक समाजस्थितीची पारदर्शकता दर्शवितात. एकंदरीतच अण्णा भाऊ साठे यांचे हे सर्व पोवाडे हक्कासाठी, न्यायासाठी तसेच देशप्रेमाच्या हेतूंनी लिहिले गेले असल्याचे दिसतात.

वास्तविक पाहता अण्णा भाऊंच्या शाहिरी काव्यातून सामाजिक, आर्थिक, राजकीय विषमता व त्या विषमतेला विरोध करणारी तत्वे दिसतात. सर्वसामान्य माणसांना न्याय मिळाला पाहिजे, त्यांचे संघर्षमय जीवन सुखी व्हावा हा लोककल्याणकारी नवविचार त्यांच्या शाहिरी काव्यातून प्रतित होतो. त्यामुळे त्यांच्या शाहिरी काव्यास

VOL- XII ISSUE- II FEBRUARY 2025 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 8.379 ISSN 2349-638x

'नव विषयांची मांडणी करणारे तत्त्वज्ञान' असे म्हणणे रास्त ठरेल.

शेतकरी, कामगार आणि दलित यांच्या नित्य जीवनात उद्भवणाऱ्या असंख्य समस्यांची पाळंमुळं उखरून त्या समस्यांना वाचा फोडण्याचे काम त्यांनी लावणी काव्यातून केलेले दिसून येते.

*"माझी मैना गावावर राहिली!*
*माझ्या जीवाची होतीय काहिली!"*

मराठी माणसाच्या हृदयावर आजही विराजमान असलेली त्यांची ही विशेष लोकप्रिय लावणी. लावणीतील मैनाच्या विरहाच्या वर्णनामुळे प्रथमदर्शनी ही लावणी श्रृंगारिक भासते. परंतु तसें मुळीच नाही. कारण अण्णा भाऊ साठे हे एक सच्चे समाजसेवक आहेत, सच्चे शाहीर आहेत, त्यामुळे अशा समाजसुधारकाच्या लावणीत श्रृंगार ऐवजी मराठी माणसांच्या अंतरात्म्याचा आक्रोश दिसतो. संयुक्त महाराष्ट्रातील बेळगाव, कारवार, निपाणी या भागातील जनतेला अण्णा भाऊंनी मैना म्हटले आहे. जनतेचा आक्रोश स्वयम शब्दांमध्ये व्यक्त करताना अण्णा भाऊ यांच्या शाहिरी मनाची हळहळ व्यक्त झाल्याची दिसते. त्यांची 'मुंबईच्या लावणी' ही मुंबईचे वास्तव दर्शन घडविते. १९४२ च्या काळातील मुंबईच्या विषमतेचे चित्र अण्णा भाऊ यांनी अतिशय समर्पकपणे रेखाटले आहे. त्यांचा लावणी काव्य लिहिण्यामागचा दृष्टिकोन हा व्यापक असून ते दुःख केवळ कष्टकरी लोकांच्या जीवनाचा ठाव घेते. त्याच्या दृष्टीस आलेल्या कामगार, कष्टकरी व श्रमिक यांच्या व्यथा वेदना त्यांनी अगदी जशाच्या तशा मांडल्या. मुंबईत पोटाची आबाळ होणारा माणूस चवताळून उठतो आणि माणसालाच खातो, मुंबईत माणूस उघडपणे लुटतो आणि लुटला जातो असं अण्णा भाऊ यांनी अगदी तळमळीने आपल्या लावणी काव्याद्वारे सांगितले आहे. त्यांची लावणी ही मुंबईचे वैभव, विलासीपणा सांगत नाही तर ती मुंबईची विषमता, अन्याय, दारिद्र्य, दलित कामगार कष्टकऱ्यांच्या दुःखाची कहाणी सांगते. भांडवलदार, श्रमिक व शोषितांच्या सुखविलासाचे दर्शन घडविते.

अण्णा भाऊ यांच्या मते, "पृथ्वी ही शेषाच्या मस्तकावर तरली नसून ती दलित कष्टकरी कामगारांच्या हातावर तरलेली आहे." हे विश्व श्रमिकांच्या घामाच्या धारांनी ओथंबून वाहत असल्याचे त्यांना दिसते. म्हणूनच कामगारांच्या जीवनावर, त्यांच्या श्रमांवर अण्णा भाऊंची खूप निष्ठा होती आणि हीच निष्ठा त्यांनी आपल्या शाहिरी काव्यातून पुढील प्रमाणे मांडल्याचे दिसते .

*"तुझ्या कामामधून तुझ्या घामामधून*
*उद्या पिकल सोन्याचं रान*
*चल उचल हत्यार,गड्या होऊन हुशार*
*तुला नव्या जगाची आण.*
*भाग्य लिहलेल माझ तुझं*
*घाम आलेल्या भाळावरी*
*स्वप्न लपलेल माझ तुझ*
*इथ दरड माळावरी*
*घेवून कुदळ खोरं,चला जावू म्होरं*
*देवू देशाला जीवन दान*
*चल उचल हत्यार.."*

अण्णा भाऊंची शाहीरी ही केवळ मनाला सुखवत नव्हती तर ती अन्यायाविरुद्ध दंड थोपटवते. त्यांच्या शाहीरीमध्ये बुलंद आवाज आहे, अफाट ताकत आहे, त्यांचा एखादा पोवाडा जरी ऐकला तरी त्यातून सामाजिक क्रांतीची मशाल धगधगल्याशिवाय राहत नाही. त्यांच्या सामाजिक क्रांतीचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे संयुक्त महाराष्ट्र चळवळीत त्यांनी गायलेली शाहिरी होय. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा काळ हा लाखो मराठी माणसांचा लक्षवेधक काळ होता. त्यातच अण्णांनी आपल्या खणखणत्या आवाजात डफावर थाप देत शाहिरी काव्याची उधळण करून लोकांना जागृत केले होते. त्यांचे शाहीरी काव्य हे आनंद प्राप्तीसाठी नव्हे, मनोरंजनात्मक नव्हे तर ते प्रबोधनात्मक होते. त्यांनी स्थापन केलेल्या 'लालबावटा ' कलापथकाच्या विविध कार्यक्रमांमध्ये अण्णा भाऊ आपल्या खणखणीत आवाजामध्ये शाहिरी काव्याचे गायन करून समाजामध्ये नवविचारांची रुजवणूक करीत होते. अण्णा भाऊंची शाहिरी काव्य हे त्या काळात समाज प्रबोधनाचे एक माध्यमच ठरले.

समारोप : अशा रीतीने लोकशाहीर आण्णा भाऊ साठे यांचे शाहिरी काव्य हे समाज परिवर्तनाचे एक माध्यम ठरते. त्यांचे शाहिरी काव्यातील योगदान अतिशय महत्त्वपूर्ण असून त्यांच्या या योगदानाची दाखल अभ्यासकांनी व समीक्षकांनी घेतली आहे. अण्णा भाऊ साठे यांच्या समग्र शाहिरी वाङ्मयाचा अभ्यास केल्यानंतर हाती आलेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

१. अण्णा भाऊ साठे यांचे शाहिरी काव्य हे मनोरंजनात्मक नसून ते प्रबोधनात्मक असल्याचे दिसून येते.
२. शाहिरी काव्यामध्ये सर्वप्रथम लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांनी लावणीच्या सुरुवातीला गण गवळणी मध्ये देव देवतांना वंदना न करता आपली मायभूमी व माय भूमीतील राष्ट्रपुरुषांना वंदन करून मातृभूमी बद्दलचे प्रेम व्यक्त केल्याचे दिसते.
३. अण्णा भाऊ साठे यांच्या शाहिरी काव्यातून दलित, कष्टकरी व कामगार यांच्या समस्यांचे चित्रण रेखाटले असून या समस्यांवर सरकारचे लक्ष केंद्रित करण्याचा प्रयत्न केला गेला असल्याचे दिसते.
४. अण्णा भाऊ साठे यांचा कामगार जीवनावर असलेली निस्सीम भक्ती दिसते तसेच कामगारांच्या समस्यांवर प्रकाश टाकल्याने कामगारांच्या जीवनात परिवर्तन घडून आणणे गरजेचे आहे हा विचार व्यक्त केला आहे.
५. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील गीतांमधून मुंबई ही महाराष्ट्राला मिळावी असा आशावाद त्यांच्या शाहिरी काव्यात जागोजागी प्रतीत झाल्याचा दिसतो.

**संदर्भग्रंथ**

१. संपा. डॉ. झोंबाडे मनीषा, अण्णा भाऊ साठे समग्र साहित्य : एक चिंतन, लेखक - प्राचार्य डॉ. संजय शेजव, 'अण्णा भाऊ साठे यांचे शाहिरी काव्य : एक दृष्टिक्षेप', सिद्धी प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती १ ऑगस्ट २०२४.
२. संपा. डॉ. मनीषा झोंबाडे, अण्णा भाऊ साठे समग्र साहित्य : एक चिंतन, लेखक -डॉ. प्रवीण मस्तुद, 'कम्युनिस्ट नेते कॉम्रेड अण्णा भाऊ साठे', सिद्धी प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती १ ऑगस्ट २०२४.
३.डॉ. अंभोरे बाबुराव, ' अण्णाभाऊ साठे आणि अमर शेख यांची शाहिरी : एक आकलन, स्वरूप प्रकाशन,
४.अण्णा भाऊ साठे यांचे पोवाडे व लावण्या, लोकनाट्यगृह प्रकाशन मुंबई बारावी आवृत्ती २०१७
५. डॉ. मनीषा झोंबाडे, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंती विशेष अभिप्राय, दैनिक सकाळ सोलापूर आवृत्ती १ ऑगस्ट २०२४